सन २०१७-१८ च्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागणी.. २२१० १३८५, २१-पुरवठाव सामग्री या तपशीलवार शिर्षामध्ये रु.१,०९,६६,९००/- पुरवणी तरतूद मंजूर करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुरवणी मागणी-२०१७/प्र.क्र.३९०/राकावि-२

गोकूळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई.
दिनांक : १३ नोव्हेंबर, २०१७.

वाचा -

१) शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३, दिनांक १८ ऑगस्ट, २०१७.
२) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांचे पत्र क्र.आयुक्त/राकावियो/का.क्र.७/ २०१७-१८/पुरवणी मागणी-पावसाळी अधि.-२०१७/१४१८३-८६, दिनांक २० सप्टेंबर, २०१७.

प्रस्तावना -

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांच्या प्रलंबित औषधी देयके, विमाधारकांची वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीची प्रलंबित देयके प्रदान करण्यासाठी पावसाळी अधिवेशन-२०१७ मध्ये पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती. सदर पुरवणी मागणी रक्कम रु.१,५६,६७,०००/- (अक्षरी रु.एक कोटी छप्पन लाख सदुसष्ट हजार फक्त) मंजूर करण्यात आली आहे. सदरचे अनुदान राज्य कामगार विमा योजनेच्या (२२१० १३८५-२१) पुरवठा व सामग्री या तपशिलवार लेखाशिर्षाखाली (BDS) प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने सदर अनुदान (BDS) प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय -

आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई यांना २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी “मागणी क्रमांक आर-१, २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी आरोग्य सेवा (विषम चिकित्सा), १०२-राज्य कामगार विमा योजना, १०२-१- बृहन्मुंबईतील व मुफसल क्षेत्रातील राज्य कामगार विमा योजना, (०१) (०२)- वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, (२२१० १३८५) (योजनेत्तर) (अनिवार्य), २१-पुरवठा व सामग्री या तपशिलवार लेखाशिर्षा अंतर्गत पुरवणी

मागणीद्वारे एकूण रु.१,५६,६७,०००/-(रुपये एक कोटी छप्पन लाख सदूसष्ट हजार फक्त) एवढे मंजूर झालेल्या अनुदाना पैकी ७०% च्या मर्यादेत रक्कम रुपये १,०९,६६,९००/- (रुपये एक कोटी नऊ लाख सहासष्ट हजार नऊशे फक्त) एवढी रक्कम कोषागारातून आहरित/खर्च करण्यास मंजुरी देत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३, दि.१८ ऑगस्ट, २०१७ अन्वये प्राप्त मंजुरीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११३१२१६२७८६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhise Govind Changoji

Digitally signed by Bhise Govind Changoji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9596d652d5b6cb0f88e4c39c6c2adf97629debbf12176865f2683a6eb9318e8, cn=Bhise Govind Changoji
Date: 2017.11.13 12:28:52 +05'30'

डॉ.गोविंद चां. भिसे

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई.
२. संचालक, (वैद्यकीय/प्रशासन), रा.का.वि.यो.मुंबई.
३. सहायक संचालक (लेखा), रा.का.वि.यो., मुंबई.
४. वैद्यकीय प्रशासन अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, मुंबई/पुणे/नागपूर.
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७. कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर.
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१०.अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.विभाग मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (राकावि-२).